Aethel Research Digest Juncture
An International Journal

**Aethel Research Digest Juncture: An International Journal**
**E-ISSN: 3139-1672**

**Vol. 2, Issue 4, July- August 2026**

# आनंद यादव यांच्या कादंबऱ्यातील स्त्री चित्रणाचा एक अभ्यास

**प्रा. राजा जगताप**

मराठी विभाग प्रमुख,
रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, धाराशिव, महाराष्ट्र, भारत
ईमेल: rajajagtap123@ gmail.com

***DOI:*** ***https://doi.org/10.5281/zenodo.22162504***

**Dates**
**Summation:11/08/2026**

**Revised: 25/08/2026**

**Accepted: 27/08/2026**

**Published:30/08/2026**

**गोषवारा**

प्रा. डॉ. आनंद यादव यांच्या निवडक कादंबऱ्यांमधील स्त्रीचित्रणाचा अभ्यास या संशोधनातून करण्यात आला आहे. आनंद यादव यांच्या ग्रामीण व आत्मचरित्रपर लेखनातून तत्कालीन ग्रामीण समाजजीवन, स्त्रियांचे दुःख, दारिद्र्य, सासुरवास, पुरुषी वर्चस्व, कौटुंबिक अन्याय आणि स्त्रीच्या दुय्यम स्थानाचे वास्तववादी चित्रण दिसून येते. प्रस्तुत अभ्यासात 'झोंबी', 'नांगरणी', 'घरभिंती' आणि 'नटरंग' या कादंबऱ्यांतील स्त्री व्यक्तिरेखांचा विशेष विचार करण्यात आला आहे. 'झोंबी'मध्ये तारा, आकणी व इतर स्त्रियांच्या माध्यमातून स्त्रीला सहन करावा लागणारा कौटुंबिक छळ व सासुरवास, 'नांगरणी'मध्ये घोडाबाईच्या माध्यमातून स्त्रीच्या विवाहविषयक स्वातंत्र्याचा अभाव, तर 'घरभिंती'मध्ये सुंदरा व हिराबाई यांच्या माध्यमातून स्त्रीजीवनातील शारीरिक व मानसिक यातना अधोरेखित झाल्या आहेत. 'नटरंग'मधील दारकीच्या व्यक्तिरेखेतून कलाकाराच्या पत्नीला भोगावा लागणारा सामाजिक अपमान, दारिद्र्य, लैंगिक शोषण आणि कौटुंबिक संघर्ष यांचे चित्रण झाले आहे. या सर्व स्त्री व्यक्तिरेखा विशिष्ट कुटुंबातील असल्या तरी त्या तत्कालीन ग्रामीण समाजातील स्त्रियांच्या व्यापक दुःखांचे प्रतिनिधित्व करतात. त्यामुळे आनंद यादव यांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीचित्रण हे ग्रामीण स्त्रीजीवनातील विषमता, अन्याय आणि संघर्ष यांचे वास्तवदर्शी प्रतिबिंब ठरते.

***मुख्य शब्द:*** *झोंबी, स्त्रीचित्रण, घरभिंती, डॉ. आनंद यादव, कादबरी वाङ्मय, आत्मचरित्रात्मक कादंबरी*

**Plagiarism Results** "We maintain a strict zero-tolerance policy towards plagiarism. The submitted manuscript has undergone a rigorous plagiarism check. The current report indicates a 0% match across 03 websites, ensuring the uniqueness and integrity of the research work."

"**Licensing:** This article is licensed under CC BY 4.0. It allows free use and distribution with proper attribution to the original author."

**Citation:** Raja Jagtap (2026), A Study of the Depiction of Women in the Novels of Anand Yadav, Aethel Research Digest Juncture: An International Journal, 2(4),77–86.

## १. प्रस्तावना:

प्रा. डॉ. आनंद यादव यांचा जन्म कागल जि. कोल्हापूर येथे ३० नोव्हेंबर १९३५ रोजी, झाला.डॉ. यादवांचे बालपण कागल या खेडेगावातच गेले. त्यांचे वडील शेतमजूर होते. यादवांचे पूर्वज कर्नाटकातून, महाराष्ट्रात आले व कागल येथेच स्थायिक झाले. जकात वसुलीचे काम त्यांच्या पूर्वजांनी केले होते म्हणून त्यांना कागल येथे 'जकाते' म्हणले जाऊ लागले. डॉ. आनंद यादव सुरवातीला आनंद रत्नाप्पा जकाते असेच नाव लिहित होते. पुढे १० वी पास झाल्यावर ते जेव्हा रत्नागिरी येथे गेले तेंव्हा तेथील प्राचार्य भावे व पु.ल. देशपांडे यांचा सहवास त्यांना मिळाला आणि पु.ल.च्या सांगण्यावरून जकाते' हे पडनाव टाकून यादव। हे मूळचे आडनाव धारण केले. आनंदा रत्नाप्पा जकातेचे आनंद रतन यादव हे नाव झाले.

आनंद यादवांच्या वडीलांना कागल येथे शेती नव्हती. ते तेथील मोठ्या शेतकऱ्याची भाडेपट्ट्याने जमीन करायचे पुढे 'कसेल त्याची जमीन, हा कुळ कायदा आला परंतु त्या शेतीमालकाने यादवांच्या वडीलांची म्हणजेच(दादा) ची फसगत करून जमीन काढून घेतली आणि यादवांच्या कुटुंबाच्या दारिद्र्यात खुपच भर पडली. त्यांच्या कुटुंबाला मजूरी करण्याशिवाय पर्याय उरला नाही- त्यातच आनंदाला शाळा शिकण्याचा नाद लागला. आनंदाचं शाळेत जाणं परिस्थतीमुळे त्यांच्या वडीलांना आवडत नव्हतं. परंतु आनंदाला कळले होते..." या गरीब परिस्थितीच्य कचाट्यातून सुटायचे असेल तर शिक्षण घ्यावेच लागेल."१ शिक्षण घेण्यासाठी आनंदाने परिस्थतीशी झोंबी घेतली! शिक्षणाला झोंबणे' व परिस्थतीशी 'झोंबी' घेणे या दोन्ही अर्थाने झोंबी' या त्यांच्या आत्मचरिज्यपर कदंबरीचे नाव सार्थ वाटते.

कागलमध्ये १० वी पर्यंतचे शिक्षण घेतांना शाळा सुटल्यावर वडीलाबरोबर मळयात पडेल ते काम केले. पुढे रत्नागिरीला शिक्षण घेतले बी-ए-पर्यंतचे शिक्षण कोल्हापूर येथे घेतले. एम.ए. चे शिक्षण पुणे येथे घेतले व पुणे आकाशवाणी केंद्रावर काम करु लागले तेथेच त्यांचा व्यंकटेश माडगूळकर, बा. भ. बोरकर, शंकर पाटील यांच्याशी परीचय झाला. कोव्हापूरात महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करतानाच त्यांचे हिरवं जग' पुस्तक प्रकाशित झाले होते. त्या पुस्तकाला महाराष्ट्र राज्याचा पुरस्कार ही मिळाला होता-एम.ए.चे शिक्षण पूर्ण झाल्यावर ते प्राध्यापक झाले.

मराठी ग्रामीण कादबरी वाङ्मयाच्या दृष्टीने १९८० ते १९९१ हा कालखंड अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहे. या कालखंडात आनंद यादव यांची 'नटरंग, रा.रं. बोराडे यांच्या 'सावट' व 'चारापाणी' डॉ. वासुदेव मुलाटे यांची विषवृक्षाच्या मुळया, विश्वास पाटील यांच्या 'पांगिरा' व झाडाझडती, राजन गवस यांच्या भंडारभोग' व' चौंडक, उत्तम बंडू तुपे यांची 'झुलवा, बाबू बिरादार यांची 'कावड, बाबाराव मुसळे यांची 'हाल्या हाल्या दुध दे, मोहन पाटील यांच्या 'बिगाड' व 'खांदेपालट, पुरुषोत्तम बोरकर यांची' कुणाच्या खांदयावर' या कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या होत्या. १९८० ते

१९९१ या कालावधीत पहिल्या पिढीतील, ग्रामीण कादंबरी लेखण करणारे श्री व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील या कादंबरीकाराचे लेखण थांबले होते. तरी डॉ. आनंद यादव, रा. रं बोराडे हे दुसऱ्या पिढीतील ग्रामीण कादंबरीकार यांचे लेखण सुरु होते.

## २. संशोधन पद्धती:

प्रस्तुत संशोधनात प्रा. डॉ. आनंद यादव यांच्या जीवनप्रवासाचा आणि त्यांच्या ग्रामीण साहित्यातील योगदानाचा अभ्यास करण्यासाठी **'वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धती'** वापरण्यात आली आहे. यासाठी प्राथमिक व द्वितीयक वर्गवारीतील माहितीच्या स्रोतांचा आधार घेण्यात आला आहे:

- **प्राथमिक स्रोत:** डॉ. आनंद यादव यांचे **'झोंबी'** हे आत्मचरित्र, **'हिरवं जग'** हा पहिला काव्यसंग्रह/पुस्तक आणि त्यांची **'नटरंग'** ही कादंबरी यांसारख्या मूळ साहित्यकृतींचा प्रत्यक्ष अभ्यास.
- **द्वितीयक स्रोत:** १९८० ते १९९१ या कालखंडातील समकालीन ग्रामीण साहित्य, इतर लेखकांच्या कादंबऱ्या (उदा. रा. रं. बोराडे, विश्वास पाटील, राजन गवस इत्यादी) आणि त्यावरील समीक्षात्मक संदर्भ.

## ३. विश्लेषण प्रक्रिया:

**अ. व्यक्तिगत व सामाजिक पार्श्वभूमी:** डॉ. आनंद यादव यांचा जन्म (३० नोव्हेंबर १९३५), कौटुंबिक दारिद्र्य, 'जकाते' वरून 'यादव' नाव बदलण्याचा प्रवास आणि प्रतिकूल परिस्थितीवर मात करत घेतलेले शिक्षण यांचा सांख्यिकीय व कालानुक्रमाने अभ्यास केला आहे.

**ब. साहित्यिक योगदान व कालखंडीय वर्गीकरण:** मराठी ग्रामीण कादंबरीच्या दुसरया पिढीतील (१९८०-१९९१) डॉ. आनंद यादव यांच्या स्थानाचे मूल्यमापन करण्यासाठी, पहिल्या पिढीतील (माडगूळकर, शंकर पाटील) व दुसरया पिढीतील इतर समकालीन लेखकांच्या साहित्याशी तुलनात्मक विश्लेषण (Comparative Analysis) केले आहे.

## ४. आनंद यादव यांचे कादबरी लेखण:

१) गोतावळा (१९७१)

२) नटरंग (१९८०)

३) एकलकोंडा (१९८०)

४) माऊली (१९८५)

५) झोंबी (१९८७)

६) नांगरणी (१९९०)

७) घरभिंती (१९९२)

८) काचवेल (१९९७)

९) कलेचे कातडे (२००१)

१०) लोकसखा ज्ञानेश्वर (२००५)

११) संत सार्थ तुकाराम (२००८) या कादंब—या प्रसिद्ध झाल्या आहेत.

आनंद यादवांनी महाविद्यालयीन शिक्षण घेतानाच **'हिरवं जग'** काव्यसंग्रह लिहिला होता. व त्याच दरम्यान त्यांनी पहिली 'एकलकोंडा' कादंबरी लिहिली होती. मात्र ती १९८० साली प्रसिद्ध केली. स्वातंत्र्योत्तर काळात यांत्रिकीकरण आले आणि खेडी बदलू लागली. ग्रामसंस्कृतीच्या-हासाला सुरवात झाली. यंत्रांचा शेतात प्रवेश झाला आणि 'गोतावळ्यात' आपला जीव गुंतून असणाऱ्या नारबाच्या दु:खाचा शेवट झाला. डॉ. आनंद यादव यांनी साहित्याचे विविध प्रकार हाताळले. वेगवेगळे अनुभवविश्व त्यांनी आपल्या साहित्यकृतीत हाताळले परंतु आपण ग्रामीण लेखक आहोत याचे भान त्यांनी कधीही दृष्टीआड होऊ दिले नाही१" असे रविंद्र ठाकूर यांनी लिहीले आहे.

समकालीन समाजाचे चित्रण यादवांच्या कादंबरीतून आले आहे. स्त्री ही समाजाचाच महत्वाचा एक भाग आहे. ग्रामीण स्त्रियांचे जीवन त्यांच्या कादंबरीत आले आहे. त्यांच्या झोंबी', 'नांगरणी, 'घरभिंती' या आत्मचरिज्यपर कादंबऱ्या आहेत. यादवांची आई-तारा तिला झालेला सासुरवास, त्यांच्या बहिणीला झालेला त्रास, त्यांच्या दोन आत्त्यांना भोगावा लागलेला त्रास या त्यांच्या घरातील स्त्रीया यांच्या व्यथा, वेदना मांडल्या आहेत. 'नटरंग' मधील दारकाचं उद्ध्वस्त जीवन त्या कादंबरीत आलं आहे.

**१. झोंबी (१९८७):**

डॉ. आनंद यादव यांची पहिली आत्मचरित्रात्मक कादंबरी ''झोंबी' ही १९८७ साली प्रसिद्ध झाली. यादवांची आई तारा, त्यांच्या बहिणी, दोन आत्या, या घरातील स्त्रियांना सोसावा लागलेला जाच, त्रास, सासुरवास मग ते सासर असो की, माहेर जन्मापासून स्त्रियांना मिळणारी दुय्यम वागणूक स्त्रियांना उपसावे लागणारे कष्ट याचे चित्रण त्यांनी झोंबी' कादंबरीत केले आहे. झोंबीची सुरवातच स्त्री अन्यायाने होते. यादवांची आई एक वर्षाची असतानाच लग्न झालं होतं. या प्रसंगाने झोंबीची सुरवा त करताना विहितात..." ताराचं लग्न झालेलं ताराला माहीत नाही ती एक वर्षाची असताना तिचं लग्नं झालं. तिच्या पाळण्यालाच बाशिंग बांधले होतं. त्यावेळी रतनू आठनऊ वर्षाचा होता.'२' यादवांच्या आईचं म्हणजेच ताराचे नांदने सहा-सात वर्षाचं असताना सुरु झालं. सासुच्या हाताखाली कामे करुन तिचा जीव कैंगटून जात

असे. ननंदा तिला कामे सांगत. ताराचं वय लहान असत्याने व होणाऱ्या त्रासामुळे ती माहेरी पकूज जात, तेंव्हा तिचा रागीट नवरा रतनु तिला चाबकाने मारत परत घरी आणत असे. प्रसंगी तिचे डोकं फोडत... आशा यातना सहन करत ताराला १२ मुले झाली!

आनंद यादव चौथीला असतानाच त्यांच्या आईवडीलांना दोन जुळया मुली म्हणजेच यादवांना दोन बहिणी झाल्या. घरात त्यांच्या  सदस्य संख्या सात झाली.लेक -आनंद यादव चौथीला आसतांना त्यांना दोन जुळया बहिणी झाल्या. तेंव्हा लोक हसत होते. लोक हसायले तवा दादानं ताराला म्हणजेच त्यांच्या आईला ओली बाळांतीण असताना बाजंवरच बदडले! रक्तबंबाळ केलं! ताराला नवऱ्याकडून होणारी सातत्याने मारहाण तेंव्हा तिनं तीनदा जीव देण्याचा प्रयत्न केला. यासंदर्भात यादव लिहितात.... " दादाच्या या माराला आणि जाचाला कंटाळून आई तीन, चार वेळा विहिरीत पडायला गेली होती. पण आमचं सुदैवं की ज्या शेतक-याच्या विहिरीवर ती जाई, तिथं नेमकं कुणाच्या तरी नजरेला येई नि तो शेतकरी तिला घरापर्यंत आणून पोचवी '३.' "झोंबी" मध्ये' यादवांची आत्त्या आकणी म्हणजे रतनूची बहिण हिला खुपच सासरवास असल्याने ती माहेरला पळून येत असे परंतु आईवडीलीच्या नावासाठी मुलीने प्राण गेला तरी सासरीच नांदली पाहिजे अशी माहेरच्यांची मानसिकता होती. बहिणीनं नांदायला जावे म्हणून रतनूने उलथण्याने डागले होते व सामरला सोडले होते. आकणीला माहेरात स्थारा नाहीं है लक्षात आल्यावर त्यांनी आकणीचा खुपच छळ केला. तिला उपाशी ठेवलं. घरात कोंडलं! आकणीच्या मरणयातना सुरु झाल्या. तिचा नवरा रतनूला लग्नाचा खर्च मागायचा. तुमची बहिण मेली तर आंम्ही जबाबदार नाही म्हणायला" चार दिवसात आलास तर बरं न्हाईतर तिच्या जीवाचे बरंवाईट झाले तर आमी जबाबदार नाही.'४" तेंव्हा रतनूने पोलीसात तक्रार केली माञ उपयोग झाला नाही आकणीची आवस्था जोंधळयाच्या घाटागत झालती-शेवटी रतनने आकणीला बैलगाडीत घालून गावी आणलं असाच सासुरवास यादवांच्या बहिणीला झाला होता याचे चित्रण झोंबी' कादंबरीत आले आहे.

यादवांच्या माईने आपल्या आनसा या ११ वर्षाच्या पोरीचा विवाह १४, १५ वर्षांनी आनसापेक्षा मोठा असणाऱ्या भावाबरोबर करून दिला होता" कारण भावाला वठणीवर आणता येईल. माहेरबरोबर संबंध चांगले राहातील याठिकाणी आपल्या मुलीचे हित पाहाण्यापेक्षा भावाचेच हित पाहाते आणि पोरीला दुय्यम समजते. हे दिसते. आनसाचा नवरा है। पैशवान होता परंतू आनसावर बालवयातच लग्न करण्याची वेळ आलती. आनसाच्या दुःखाला आईच जबाबदार असल्याचे दिसते.

'झोंबी' कादंबरीतील स्त्रीचित्रणाचा अभ्यास केल्यावर असे दिसते की, स्त्रीचे जीवन दुय्यम दर्जाचे होते, पुरुषवर्ग स्त्रीचा फक्त वापरच करून घेतात, स्त्रीला कस्पटासमानच लेखतात. परंतु आपल्या वाट्याला जे आलं ते आपल्या

पोरीच्या वाट्याला येऊ नये अशी ताराची भूमिका 'झोंबी' कादबरीत दिसत नाही. पारंपारिक संस्कृतीचा पगडा या स्त्रीव्याक्ति-रेखेवर दिसतो. तारा आपल्या पतीचा (नवऱ्याचा रतनूचा) भरमसाठ मार खात लेकरांना वाढवते पण रत्तनू जेंव्हा आजारी पडतो तेंव्हा त्याची अखरीला देखरेख करते.

'झोंबी' कादंबरीत यादवांच्या आईला म्हणजेच ताराला अपार दुख भोगावे लागले परंतु पुढे तारांच्या मुलींची आनसा, हिराची या दुखापासून सुटका झावेली दिसत नाही. यादवांच्या बहिणींना सासुरवास, त्यांचा जाच सोसावाच लागला. आईच्या पिढीपासुन पुढच्या बहिणींच्या पिढ्यानांही सासुरवास सोसावाच लागला! जाचाची परंपरा एका पिढीपासुन दुसऱ्या पिढीपर्यंत चालत आलेली दिसते. या कादंबरीतील स्त्रियांना आपला पत्ती कसा आसावा १ किंवा नसावा याचे स्वातंत्र्य दिसत नाही. 'स्त्रियांना स्वतःचे मत असते 'असे येथे दिसतच नाही. सख्खी आई आपल्या मुलीच्या भविष्याचा विचार करताना दिसत नाही. याला गरीबी, दारिद्रय ही कारणे दिसतात. मुली दिसायला चांगल्या आहेत परंतु लग्न जमवतांना हुंडा नसल्याने कुणालाही मुली दिल्या जातात हे यादवांच्या कादंबरीत दिसते. झोंबी' कादंबरीतील दुःख भोगणाऱ्या स्त्रिया यादवांच्या घरातील असल्या तरी त्यावेळसच्या समाजाच्या परंपरेच्या बळी आहेत असे वाटते. त्यावेळेसच्या स्त्रियांना अफाट मरणयातनाच महन कराव्या लागल्या हे 'झोंबी'तील स्त्रीव्यक्तिरेखांच्या चित्रणावरून वाटते आहे.

**२. नांगरणी (१९९०)**

'झोंबी' कादंबरीनंतर आनंद यादवांची 'नांगरणी 'ही आमचरित्रात्मक कादंबरी प्रसिद्ध झाली. नांगरणी' कादबरीची सुरवात... आनंदा एस. एस. सी. पास झाला या बातमीने होते. या कादंबरीत यादवांचे एम.ए.-पर्यंतचे शिक्षण कसे पूर्ण झाले ते सांगितले आहे 'झोंबी' कादंबरीत आई- तारा, आत्त्या आकणी, बहिण आनसा या घरातीलच स्त्रियांच्या व्यक्तिरेखा दुःख भोगणाऱ्या आहेत. पुरुषीवर्चस्वाखाली त्या चिरडल्या गेल्या आहेत. 'नांगरणी' कादंबरीतही स्त्रीव्यक्तिरेखांची हिच अवस्था झाली आहे.

'नांगरणी' कादंबरीतील स्तीचित्रणाचा अभ्यास करताना एक स्त्रीव्यक्तिरेखा कायमची लक्षात रहाते ती म्हणजे आनंद यादव यांची बहिण घोडाबाई. ती दिसायला सुंदर आहे. ती जेव्हा लग्नाला आली होती तेंव्हा हुंडा द्यायला पैसे नाहित म्हणून सिद्धनेली गावचा एक मळकटलेला, सालगडी दिसावा तसा पोरगा होता त्या पोरालाच आईने, घोडाबाईला द्यायचा विचार केला होता यादव आपल्या धोंडाबाईला विचारतात. तुला मुलगा पसंद आहे का? तेंव्हा धोंडाबाई म्हणते..." आईला पसंद हाय न्हवं? मग तिच्या म्होरं माझं काय चालणार? तिला घरात न्हात्याधुत्या वेळी ठेवायच्या

म्हणजे, सुरुंगाच्या दारुचे कोठार ठेवल्यागत वाटत्तय तिला लेकी जड झाल्यात... जन्मलो तवाच, एकाएकीच्या गळयाला नख लावायच हुतं तिनं १ कशाला एवढ्यातरी वाढवायच्या?" ५.

आनंद यादव आईला सांगतात 'धोंडूला हा मुलगा पसंत नाही." तेंव्हा आई तारा म्हणते..." तूबी आन्दा, आता शिकून शाणा व्हायला लगलाईस पसंती ना पसंती भटबामणाच्यात, शिकल्या सवरल्यांच्यात चालती हितं कुणब्या-कष्टक-यांच्या घरात चालत नाही"'६' छ शेवटी घोंडाबाईचे लग्नं त्या आळशी पोराबरोबर होते. धोंडाबाईचा नवरा एका देवरसणीच्या नादाला लागतो. थोडाबाई परत माहेरी येते. धोंडाबाईच्या नवऱ्याचा मृत्यू होतो. धोंडा बाईचा पुर्नरविवाह होतो. नांगरणी' कारबरीत थोडाबाईला स्वतच्या मनाने नवरा निवडता येत नाही. तिची तिला किंमत मोजावी लागते. धोंडाबाई या स्वत्तःच्या बहिणीची व्यथा येथे यादवांनी चित्रित केली आहे

**३. घर भिंती (१९२२)**

यादवांच्या मामांनी आपली पोरगी आक्काताई आनंद यादवालाच द्यायची म्हणून यादवावर दबाव टाकला होता. परंतु मामाची मुलगी म्हणजे मामे-बहिण सख्या बहिणीसारखीच असते म्हणून लग्न करण्यास नकार दिला तेंव्हा मामा म्हणतो..." तू आक्काताईसंग लगीन कर दोन तीन वरस काय हुतय ते बघू आणि न्हाईच तुला तिच्याबद्दल बायकुपणाची भावना वाटली तर मग दुसरं लगीन कर एकाला दोन बायका असल्या तर तोटा नाही. एक हितं कागलला आक्काच्या (ताराच्या आईच्या हाताखाली राहील नी दुसरी तुझ्यामंग नोकरीच्या जागी यील एक नोकरी करल नी दुसरी घरदार संभाळल... हेचा विचार कर नि मला उद्या काय ते सांग! ७. मामा स्वतःची इच्छा पुरी करण्यासाठी आपल्या मुलीचा वापर कसा करतो ते येथे स्पष्ट होते.

यादवांची बहिण सुंदरा हिला सौंदलगे गावी दिले होते, तिचा नवरा आळशी होता. त्याला वडील नसल्याने त्याच्या आईने लाडाने सांभाळले होते सुंदराला सासु कामाला लावत काम नसल्यावर तिला उपाशी ठेवत असतः नवरा बेदम मारत असत सुंदराला खुपच जाच होत असे. सुंदराला दररोज चार, पाच मोलावर मळा होता तेथे कामाला जावं यावं लागायचं सुंदराचं

हाल मामाच्य बायकोला पहावेत नव्हते म्हणून तिने आठवड्यातून एकदा घरी आनण्यास सांगितले तेंव्हा सुंदराचा नवरा म्हणाला..." मला भाड खाऊ घालतीस काया रांडे ह्या कडूच्या मळयात कशाला -हायलीस हितं । चल घराकडे आधी.८' तेंव्हा सुंदरा माहेरात येते परंतु आई घराला कुलुप लावते आणि यादवाला सांगते "हिला सौंदग्याला घेऊन जा" तेंव्हा यादव सुंदराला सौंदग्याला घेऊन जायला तयार हो म्हणतात तेंव्हा सुंदरा आपल्याला जाच व सासुरवास कसा होतो ते भावला म्हणजेच यादवाला सांगते. अखेर सुंदरा नवऱ्याच्या व सासुच्या त्रासाला कंटाळून वेगंगा नदीच्या पुरात

उडी टाकते म्हणजेच आत्महत्या करते...! आत्महत्या करण्यापुर्वी सुंदरा गळयातील मंगळसुत्र जोडवेत्र, विळा, नदीच्या काठावर ठेवते.

यादवांच्या पाठीवरची बहिण हिराबाई हिला घरातील म्हसरे, शेड, दररोज राखावी लागत असतं एक दिवस म्हसरं लवकर घरी घेऊन आली तर आई हिराला मारत असे. 'सेण' झाडलोट हिरालाच करावी लागत असे एके दिवशी हिरा ढेकणं मरायचे औषध घेते..." आगि आत्महत्या करते.

आनंद वादवांचे लग्न झाल्यावर ते आपल्या पत्नीला आईच्या हाताखाली ठेवत नाहित ते नोकरीच्या ठिकाणी घेऊन जातात कारण त्यांना माहित आहे. पत्नीला जाच होता कामा नये घरभिंतीत यादवांच्या दोनही बहिणी आत्महत्या करतात या स्त्रिया यादवांच्या घरातल्या आहेत.

नटरंग (१९८०) आनंद यादवांची नटरंग' ही कादंबरी (१९८०) साली प्रसिद्ध झाली या कादंबरीचा नायक गुणा आहे. एकेकाळी पहेलवान गडी, सुरवातीला तमाशा पाहातो. मजुरी करत तमाशा पहातो आणि सवंगड्याला सोबत घेऊन तमाशाचा फड उभा करतो. तमाशाची जुळवा जुळव करतो, बऱ्याच खटपटीतून तमाशासाठी दोन पोरी मिळतात त्यातील जी मुख्य असते तिच गुणाला नाच्याची भूमिका करायला लावते आणि तेथूनच गुणाच्या शोकांतिकेला सुरवात होते. आपले पोरगं तमाशात नाच्या व्हावं। हे गुणाच्या बापाला म्हणजेच --बापू मांगाला सहन होत नाही तेंव्हा तो गळपास लावून जीव देतो. "आई, पत्नी, सासरा सगळयांच्या विरोधात गुणा तमाशातील नाच्या साकार करतो!!e

'नटरंग' कादंबरीत नायक गुणा कलेची जोपासना करण्यासाठी तमाशात नाच्याची भुमिका करतो परंतु समाज त्याला कलाकार म्हणन्याऐवजी नाच्या, बुळगा, फलक्या म्हणतो गुणामुळे त्याच्या बायकोची म्हणजेच दारकीच्या दुखाला, दारिद्रयाला सुरवात होते. यासंदर्भात यादव लिहितात..." दारकीला कळून चुकलं की, गुणा कांही तमाशा सोडत नाही नि आपल्या नशिबाचं एकटे जगणं संपत नाही. तिचं मन दूर जाऊ लागलं उदासून ती मुलांना सांभाळत नि येणाऱ्या दिवस रात्रीला तोंड देत जगू लागली.१०

दारकी उसाकडेला शेळी चारतांना मळयाचा मालक उदाजी घाटगे दारकीला पाहातो. एकटीला पाहून तिची छेड काढतो गड्याकरवी तिची शेळी खोपीकडे आणाय लावतो व गड्याकडे वाड्यावर दारकीला पाठपाय सांगतो दारकीजेंव्हा वाड्यावर जाते तेंव्हा तिची इभ्रत तो लुटतो आशा पध्दतीने दारकी सगळं सहन करते व तक्रार कुठेही करत नाही. नव-याच्या वागन्यामुळे विच्यावर हा प्रसंग ओढवतो.

गुणा तमाशाचा फड उभा करतो. खेळ चांगला चालतो आणि एके दिवशी त्यांच्या तमाशावर हल्ला होतो. गुणा (नाच्यावर जबरदस्ती केली जाते याच्या बातम्या दुसऱ्या दिवशी पेपरातून येतात... दारकी आपली मुले घेऊन कायमची

माहेरी जाते. गुणा व त्याचे तमाशातील सवंगडी (कलाकार) नैराश्य घेऊन आपल्या घरी परततात. गुणा उध्वस्त मनाने घरी जेव्हा येतो तेंव्हा त्याची बायको, पोरं दारकीच्या माहेरी गेली असतात गुणा सासरवाडीला दारकीला, पोरांना परत आणण्यासाठी जातो मात्र सासरा, पोरं, दारकी गुणाबरोबर जाण्यासाठी नकार देतात वैतागून दारकी गुणाला म्हणते..." बायलीच्या अब्रुला ल हात घालणा-यांचं

मनगट धरायचे न्याट हाय का? हेमल्या तुझ्यात? तुकड्याला भुलून येणारी न्हवं मी! जा तिकडे गावाला गांड दावत हिजड्यागत नाचून पोट भर जा... ११.

## ५. समारोप

आनंद यादव यांच्या एकूण ११ कादंबऱ्या असल्या तरी माझ्या शोधनिबंधाचा विषय "आनंद यादव यांच्या निवडक कादंबरीतील -स्तीचित्रणाचा अभ्यास" जसल्याने या शोधनिबंधात डॉ. आनंद यादव यांच्या झोंबी, 'नांगरणी, 'घरभिंती' या आत्मचरित्रपर कादंबऱ्या व नटरंग' याच कादंबरीतील स्त्रीचित्रणाचा विचार केला आहे. आनंद यादवांनी त्यांच्या आत्मचरित्रपर कादंब-यातून आई (तारा) बहिणी (सुंदरा, हिरा) आत्त्या आकणी, या घरातीलच स्त्रीयांच्या दुःखाना वाचा फोडली आहे व त्यांचेड.ख. व्यथा, वेदना मांडल्या आहेत. तर 'नटरंग' कादंबरीत कागलच्या मांगवाड्यातील तमासगीर गुणा यांची शोकांतिका मांडतानाच गुणाची पत्नी दारकीची दुःखद कहाणी सांगून कलाकाराच्या बायकोला... नवरा, नाच्या झाल्यावर समाजाचे कर्म ऐकूण घ्यावं लागते. निंदा, नालस्ती सहन कशी करावी लागते व नवरा नाच्या झाल्याने... गावातील चांगला सदन जासणार उदय घाटगे दारकीची अब्रु लुटतो...! दारकीला वाच्यताही करता येत नाही. शेवटी पारकी नवऱ्याचे घर, गाव सोडून माहेरात कायमची जाते व तेथेच कष्ट करून बेकरांना वाढवण्याचा संकल्प करते. गुणा दारकीला परत आणण्यासाठी जातो परंतु दारकी व पोरं स्पष्ट नकार देतात मातंग समाजातील दारकीचं चित्रण 'नटरंग' मध्ये आल्याने... यादवांची नटरंग कादबरी वेगळी ठरते.

यादवांच्या कादंबरीतील स्त्रियावर पुरुष अन्याय करतात परंतु स्त्रिया ही स्त्रियावर अन्यायच करतात. हेच दिसते. सासरच्या जाचाला कंटाळून यादवांची आई तिनदा विहिरीत पडायला गेली होती, यादवांची आत्त्या आकणी ही सुद्धा सासुरवासा ला कंटाळली होती तिची मरणयातना यादवांनी झोंबीत मांडलीच आहे "नांगरणीत' यादवांच्या बहिणीला घोडाबाईला स्वतःच्या मनावर नवरा निवडता येत नाही-तिलाही सासुरवास सहन करावा लागतो त्यातच तिचा नवरा मरुन जातो धौडूबाईचा पुर्नरविवाह केला जातो' घरभिंती' मधील यादवांची बहिण सुंदरा हिला जाच, सासुरवास होतो तेंव्हा ती वेदगंगेच्या पुरात आत्महत्या करते तर हिराला स्वतःच्याच म्हणजेच यादवांच्या बहिणीला घरातच शेड, म्हसर रोज राखावी लागतात. त्यात आईच त्रास देते तेंव्हा हिरा ढेकणं मरायचं औषध घेते आणि झोपेतच मरते यादवांच्या

घरातील या स्त्रिया असल्या तरी समकालीन जीवनातील दुःख भोगणाम्या प्रातिनिधिक स्त्रिया आहेत. आशा प्रकारे यादव यांनी आपल्या कादंबऱ्यातून स्त्रिव्याक्तिरेखा आपल्या कादंबऱ्यातून चित्रित केल्या आहेत.

## संदर्भ

१. साहित्यिक आनंद यादव डॉ रवींद्र ठाकूर बळीवंश प्रकाशन नांदेड, प.आ. २०११ पृ. क्र.१७.

२. झोंबी आनंद यादव पृ. क्र.१.

३. झोंबी' आनंद यादव पृ क्र. १२८.

४. 'झोंबी-आनंद यादव पृ क्र १२०

५. 'नांगरणी' आनंद यादव पृ क्र २२७

६. 'नांगरणी- आनंद यादव पृ क्र २२०

७. घरभिंती' आनंद यादव पृ. क्र. १७

८. 'घरभिंती' आनंद यादव पृ. क्र.७४

९. 'नटरंग' - आनंद यादव पृक्र ७५

१०.'नटरंग' - आनंद याइय पृ. क्र. १६६

११. 'नटरंग' - आनंद यादव पृ.क. १८४